IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# भिल्ल जमातीच्या सामाजिक परिवर्तनात गुला किंवा गुलाम महाराज यांचे योगदान

**डॉ. संदीप मारोती महाजन**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग
सदगुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड (अधिकार प्रदत्त स्वायत्त)

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

*सामाजिक परिवर्तन, दारूमुक्ती, सतीपती चळवळ, सांस्कृतिक पुनरुज्जीवन, सामूहिक ओळख, आप धर्म, स्त्री सहभाग, आत्मसन्मान, नेतृत्व, सामुदायिक पुनर्रचना*

**ABSTRACT**

प्रस्तुत शोधनिबंधात विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात खानदेश परिसरातील आदिवासी, मुख्यत्वे भिल्ल जमातीच्या सामाजिक आणि नैतिक परिवर्तनासाठी आपले जीवन समर्पित करणारे सत्पुरुष गुला महाराज यांनी दिलेल्या योगदानाचा विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात आला आहे. आहे. गुला महाराज यांनी भिल्ल जमातीतून पुढे येऊन, त्यांच्यात प्रचलित असलेल्या मद्यपान, मांसाहार आणि अंधश्रद्धा यांसारख्या रुढींविरुद्ध आवाज उठवला. त्यांनी 'आप' तत्त्वज्ञानाच्या आधारे भिल्ल जमातीला स्वच्छता, सदाचार आणि व्यसनमुक्तीचा मार्ग दाखवला. या शोधनिबंधात गुला महाराजांच्या शिकवणीचे स्वरूप, त्यांनी स्थापन केलेले 'आप मंडळ' आणि त्यांच्या कार्याचा आदिवासी समाजाच्या आत्मसन्मानावर व सामाजिक स्थितीवर झालेला दूरगामी परिणाम यांचा अभ्यास केला आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 1%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Mahajan, S. M. (2025). *भिल्ल जमातीच्या सामाजिक परिवर्तनात गुला किंवा गुलाम महाराज यांचे योगदान.* IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(IV), **567–576**.

**प्रस्तावना:-**

खानदेशचा परिचय म्हणजे सध्याचे जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्हे यांचा अंतर्भाव असलेला भूप्रदेश होय. खानदेशच्या सातपुडा पर्वतरांगेच्या भागात व मैदानी प्रदेशात भिल्ल या आदिवासी जमातीचे वास्तव्य आढळून येते. निसर्गाच्या सानिध्यात राहणारे भिल्ल जमातीतील लोक हे निसर्गपूजक म्हणून ओळखले जाते. या जमातीला प्राचीन काळापासून सांस्कृतिक व ऐतिहासिक गौरवशाली परंपरा लाभलेली आहे. अशी आगळी-वेगळी ओळख असली तरी भिल्ल जमात अनेक काळापासून आर्थिक शोषण, सामाजिक मागासलेपण आणि शैक्षणिक अभावाच्या दुष्टचक्रात अडकला होता. या समाजातील व्यसनाधीनता आणि काही अनिष्ट प्रथा या त्यांच्या गरिबीला अधिक खतपाणी घालत होत्या. २० व्या शतकाच्या पूर्वार्धात, या समाजाची स्थिती अत्यंत दयनीय होती. प्रचंड व्यसनाधीनता आणि अंधश्रद्धेच्या विळख्यामुळे समाजाची मोठी आर्थिक आणि सामाजिक हानी होत असल्याने भिल्ल जमात दिशाहीन अवस्थेत जीवन व्यतीत करीत होता. या प्रदेशात ब्रिटीशांच्या आगमनाने व ख्रिश्चन मिशनरीच्या समाजकार्याने या जमातीवर काही प्रमाणात प्रभाव पडलेला दिसतो. परंतु भिल्ल जमातीला व्यसनाधीनता, अज्ञान व दारिद्र्याच्या पाशातून बाहेर काढण्याचे प्रयत्न विसाव्या शतकाच्या सुरुवातीला स्वयं भिल्ल जमातीतून गुला किंवा गुलाम महाराज यांच्या समाजसुधारणेतून झाले. अशा या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर गुला महाराज यांचे कार्य एका दीपस्तंभाप्रमाणे आहे. गुला महाराजांनी कोणत्याही बाह्य मदतीशिवाय, केवळ स्व-अनुभूती आणि नैतिक प्रेरणेतून समाज उद्धाराचे कार्य केले. गुला महाराज स्वतः याच समाजाचा भाग असल्याने, त्यांना समाजाच्या व्यथांची आणि समस्यांची खोलवर जाणीव होती. त्यांनी केवळ आध्यात्मिक उपदेश न करता, प्रत्यक्ष कृतीतून समाजसुधारणेची चळवळ उभी केली. त्यांनी सुरू केलेली चळवळ ही राजकीय नसून, 'आंतरिक शुद्धीकरणाची' होती. हा शोधनिबंध गुला महाराजांच्या सामाजिक-धार्मिक योगदानाचा आणि त्याच्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास करण्याचा प्रयत्न करतो.

**संशोधन समस्येची उत्पत्ती:-**

जळगाव, नंदुरबार व धुळे जिल्ह्यातील भिल्ल व इतर आदिवासी समाज ऐतिहासिकदृष्ट्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक दृष्टीने मागासलेला राहिला आहे. रूढी, अंधश्रद्धा, दारिद्र्य, शोषण व शिक्षणाचा अभाव या अनेक घटकांमुळे सामाजिक प्रगतीला अडथळे निर्माण झाले. अशा परिस्थितीत गुला महाराजांनी आदिवासी समाजात सामाजिक चेतना, शिक्षण, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन आणि संघटन यांच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाचा प्रवाह निर्माण केला. परंतु त्यांच्या कार्याचे शैक्षणिक, वैज्ञानिक व समाजशास्त्रीय स्तरावर आधारित संशोधन अत्यल्प उपलब्ध आहे. त्यामुळे गुला महाराजांच्या कार्याचा आदिवासी समाजावर झालेला नेमका प्रभाव अभ्यासण्याची गरज भासते. याच निरीक्षणातून या संशोधन समस्येची उत्पत्ती झाली आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये:-**

१. गुला महाराजांच्या काळातील (१९००-१९४०) खानदेशातील आदिवासी समाजाच्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीचा आढावा घेणे.
२. गुला महाराजांचे जीवन, तत्त्वज्ञान व सामाजिक कार्याचा ऐतिहासिक आढावा घेणे.
३. गुला महाराज यांचे जीवन आणि त्यांच्या 'आप' तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणे.
४. गुला महाराजांनी हाती घेतलेल्या सुधारणा चळवळी व जनजागृती उपक्रमांचे विश्लेषण करणे.

५. आदिवासी समाजातील व्यसनमुक्ती (मद्य व मांस) आणि स्वच्छतेच्या संदर्भातील त्यांच्या योगदानाचे विश्लेषण करणे.
६. आदिवासी विकासासाठी त्यांच्या विचारांचे आधुनिक संदर्भात महत्त्व मांडणे.

**पूर्वसाहित्याचा आढावा:-**

गुला महाराजांच्या कार्याचा अभ्यास करताना उपलब्ध साहित्य प्रामुख्याने आदिवासी सामाजिक चळवळी, भिल्ल समाजाचा इतिहास, आणि सतीपती/आप धर्मीय चळवळ या तीन प्रमुख स्रोत समूहांत आढळते. बहुतेक साहित्य संशोधनप्रबंध, प्रादेशिक अभ्यास आणि मौखिक इतिहासांवर आधारित आहेत. यात प्रातिनिधिक स्वरूपात पुढील साहित्याचा आढावा घेता येवू शकतो. सिमकॉक्स, ए. एच. ए. (१९१२)- मेमोर ऑफ खान्देश भिल कॉर्प्स (१८२५-१८९१), ठाकर अंड कंपनी बॉम्बे, गावित, पोपट काशीराम (अप्रकाशित शोधप्रबंध-जून - २०२२)- भारतीय स्वातंत्र्य लढ्यात आदिवासींचा सहभाग व यशवंत चेमा गावित (अप्रकाशित शोधप्रबंध-जून - २०२१)- ब्रिटीश राजवटीचा खानदेशातील भिल्ल अदिवाशी जमातीच्या समाज जीवनावर पडलेला प्रभाव एक ऐतिहासिक अभ्यास १८५७-१९४७, कवयत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, टाटीया, कांतीलाल (२०१२)- रावलपाणी, शिवसंघ प्रतिष्ठान, पुणे, पाटील भी. ना. (२०१५)- खानदेशातील समाज प्रबोधनाची चळवळ (१९००-१९५०), प्रकाशक, भूषण पाटील, पाचोरा. यांचा उल्लेख करता येतो. उपलब्ध साहित्याचे एकत्रित परीक्षण केल्यास पुढील बाबी स्पष्ट होतात- गुला महाराजांवर समर्पित विस्तृत ग्रंथ कमी, पण सतीपती/आप धर्मीय चळवळीवरील साहित्य समृद्ध आहे. त्यांचे कार्य मुख्यतः मौखिक परंपरा, लोकस्मृती आणि प्रादेशिक समाजशास्त्रीय अभ्यास यांच्या आधारे पुनर्रचित झाले आहे. परंतु त्यांच्या कार्याचा शैक्षणिक, वैज्ञानिक आणि समाजशास्त्रीय अभ्यास अत्यल्प असल्यामुळे या कार्याचा परिणाम समजून घेण्यासाठी या संशोधन समस्येची उत्पत्ती झाली.

**संशोधन पद्धती:-**

सदर शोधनिबंध हा प्रामुख्याने गुणात्मक स्वरूपाचा असून, यासाठी द्वितीयक माहिती स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये संत गुला महाराज यांच्यावरील उपलब्ध चरित्रात्मक ग्रंथ, ऐतिहासिक लेख, सामाजिक सुधारणांवरील अभ्यासपूर्ण निबंध, तसेच संबंधित विषयांवरील शासकीय अहवाल आणि जिल्हा गॅझेटियर्स यांचा समावेश आहे. वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करून माहितीचे संकलन व विश्लेषण करून निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

**तत्कालीन सामाजिक परिस्थिती:-**

भिल्ल जमातीला प्राचीन काळापासून ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरा लाभलेली आहे. ब्रिटीश सरकारविरुद्ध या जमातीने उठाव केले, तरी त्यांचा उल्लेख एक लढाऊ जमात म्हणून केला जात नाही. उलट या जमातीची अहवेलना चोर, लुटारू बंडखोर अशी केलेली दिसून येते. भिल्लांच्या सामाजिक परिस्थितीचे वर्णन कर्नल रॉबर्टसन पुढील प्रमाणे करतो, "भिल्ल हे इतर लोकांच्या विरुद्ध आणि प्रत्येक माणूस हा भिल्लांच्या विरुद्ध होता. वर्षानुवर्षे दडपशाही आणि गुन्हेगारी यामुळे आदिवासी भिल्लांना सातपुडा पर्वत रांगेत आसरा घ्यावा लागला. या जंगली प्रदेशात त्यांनी आपल्या टोळ्या संघटित करून आपल्यावरील अन्यायाचा बदला घेण्याचा

अयशस्वी प्रयत्न केला."[1] ब्रिटीश सरकारने खानदेश आपल्या अधिपत्याखाली आणला, तेव्हा भिल्लांची परिस्थिती अत्यंत दयनीय झाली. पेशवे काळात त्यांच्याकडे असलेले पारंपारिक हक्क रद्द केल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली.[2] त्यांचे जीवन अज्ञान, अंधश्रद्धा व रूढी-परंपरांनी ग्रासलेले गेले. त्यांची सामान्य स्थिती अत्यंत केविलवाणी होती. त्यांचे जीवन म्हणजे त्यांच्यासाठी नसून दुसऱ्यांकरिताच आहे, अशी परिस्थिती भिल्लांची होती. भिल्लांच्या दयनीय परीस्थितीला कारणीभूत असलेले महत्त्वाचे कारण म्हणजे मद्यपान होते. मद्यपान हे समाजातील एक अविभाज्य घटक बनले होते. यामुळे कौटुंबिक हिंसाचार, आर्थिक विपन्नावस्था आणि आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण झाल्या असल्याचा उल्लेख मिळतो. शिक्षणाचे महत्त्व समाजात रुजलेले नव्हते, ज्यामुळे विकासाच्या संधींपासून हा समाज पूर्णपणे वंचित होता. निरक्षरतेमुळे सावकार, व्यापारी आणि ठेकेदार यांच्याकडून समाजाची मोठ्या प्रमाणावर आर्थिक पिळवणूक केली जात होती. समाजात जादूटोणा, देव-देवस्की आणि अनिष्ट रूढी-परंपरा उदा. पशुबळी यांचे प्राबल्य होते. यामुळे समाजाची प्रगती खुंटली होती. भिल्ल जमातीत असा समज निर्माण झाला होता कि आपल्या पूर्वजांचे जीवन असेच गेले, आपल्या मुलाबाळांचे जीवन असेच जाणार, त्यात काहीच बदल होणार नाही. अशाप्रकारे भिल्ल समाज अत्यंत हतबल झाला होता.

**आदिवासी संत गुलाम किंवा गुला महाराज:-**

व्यसनाधीनतेच्या विळख्यात सापडलेल्या आदिवासी जमातीला बाहेर काढण्याचे काम गुला महाराज यांनी केले. तळोदा तालुक्यातील मोहिदा या गावी ३१ मार्च १८९८ रोजी गुला महाराज यांचा जन्म झाला. गुला महाराजांचे मुळगाव मोरवड (रंजनपूर) हे होते. भायल्ल्या व मयनाबाई असे त्यांच्या आई-वडिलांचे नाव होते.[3] गुला महाराजांना एकूण पाच बहिण-भावंडे होती. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची होती. वडील दुसऱ्याच्या शेतावर सालगडी म्हणून काम करत. अशा परिस्थितीत गुला मालकाच्या गायी-बैल, बकऱ्या चरण्यासाठी नेऊन वडिलांच्या कामाला हातभार लावत असे. तरूण झाल्यावर गुला देखील वडिलांप्रमाणे सालगडी म्हणून प्रामाणिकपणे काम करू लागला.[4]

शिक्षणाविना वाढलेल्या समाजात जन्म असूनही गुला महाराजांची निरीक्षण क्षमता अत्यंत प्रगल्भ होती. त्यांनी आपल्या परिसरातील सामाजिक-आर्थिक दारिद्र्याची कारणमीमांसा करताना आदिवासी समाजातील व्यसनाधीनता- विशेषतः दारू, ताडी, बिडी आणि गांजा यांसारख्या मादक पदार्थांच्या सेवनाला- मागासलेपणाचे प्रमुख कारण म्हणून ओळखले. व्यसनामुळे घरगुती कलह, वैवाहिक अस्थिरता आणि कुटुंबव्यवस्थेचे विघटन होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. याचा प्रतिकूल परिणाम बालसंस्कारांवर होऊन पुढील पिढ्याही नैराश्य व व्यसनाच्या चक्रात अडकत असल्याचे त्यांनी लक्षात घेतले. व्यसनाधीनता, दारिद्र्य आणि स्वच्छतेचा अभाव यांमुळे आदिवासी समाज मुख्य प्रवाहापासून वेगळा पडत होता आणि समाजात त्यांच्याबद्दल दुय्यम वागणूक निर्माण होत होती, ही कारणे गुला महाराजांच्या चिंतनातून स्पष्ट झाली.

[1] सिमकॉक्स, ए. एच. ए. (१९१२)- मेमोर ऑफ खान्देश भिल कॉर्प्स (१८२५-१८९१), ठाकर अंड कंपनी बॉम्बे, पृ. ७.

[2] खोबरेकर,वि. गो. (१९९४)- महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे (१८१८-१८८४), प्रकाशक, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, पृ. ९३-९७.

[3] गावित, पुष्पा यशवंत (२०१३)- संत आपश्री गुलाम महाराजांचे चरित्र, अथर्व पब्लिकेशन, जळगाव, पृ. ४५-४६.

[4] गावित, पोपट काशीराम (अप्रकाशित शोधप्रबंध-जून -२०२२)- भारतीय स्वातंत्र्य लढ्यात आदिवासींचा सहभाग, कवयत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, प्रकरण सहा- ६.५.१.१

गुला महाराजांच्या निरीक्षणांतून आदिवासी समाजातील काही अनिष्ट सामाजिक व वैयक्तिक सवयी प्रकर्षाने पुढे आल्या. दैनंदिन अथवा श्रमांती अंघोळीचा अभाव, शौचावेळी पाण्याचा अपुरा वापर, उदरनिर्वाहासाठी मोठ्या प्रमाणात पशुपक्षी हत्या, तसेच सामाजिक व्यवहारात खोटे बोलणे व फसवणुकीचे प्रकार ही प्रवृत्ती त्यांनी नोंदवली. या कृतींमुळे समाजात भांडण-तंटे वाढत होते आणि त्यातून समुदायातील स्थिरता व ऐक्य कमजोर होण्याची स्थिती निर्माण होत होती.

**समाजसुधार कार्य:-**

आदिवासी समाजात जागृकता निर्माण केल्या शिवाय या समाजाला इतर समाजाप्रमाणे सन्मानाने जगता येणार नाही, स्वत:चे अस्तित्व निर्माण करता येणार नाही. या आत्मीयतेपोटी गुला महाराज यांनी समाजसुधारणेची स्वत: पासून सुरुवात केली. यासाठी त्यांनी काहीप्रमाणात आध्यात्मिकतेची सांगड घातली. गुला महाराज यांनी आपला दिनक्रम आखून जीवनात बदल घडून आणला. सकाळी शौचास जातांना पाणी घेऊन जाणे, दररोज अंघोळ करणे व सूर्यदर्शन घेवून अन्न ग्रहण करणे, पावसाळ्यात सूर्यदर्शन होत नसल्याने तीन–चार दिवस अन्न ग्रहण करीत नसे.[5] हे करीत असतांना मात्र आपल्या दैनंदिन कार्यात खंड पडू दिला नाही. अंघोळीनंतर तांब्याभर पाण्याने हनुमान मंदिरात मूर्तीला स्वच्छ करून पूजा करीत.[6] काही दिवस त्यांनी मोरवड जवळील तुळाजे गावातील मंदिरात सेवा करून तपश्चर्या केली. त्यांना स्वत:त सकारात्मक बदल जाणवल्याने मंदिरात भेटणाऱ्यांना उपदेश देणे सुरु केले. त्यांचे रोजचे आदर्श नीतीनियम पाहून अनेक लोक त्याचे कौतुक व आदर करू लागले.

मोरवड परिसरातील लोक गुला यांच्या प्रामाणिक उपदेशांकडे सकारात्मक दृष्टीने बघत. याचा परिणाम गुला यांच्या सभोवताली लोकांची गर्दी वाढण्यात झाला. गुला यांचे उपदेश सोप्या शब्दात, अत्यंत ग्रामीण भाषेत असायचे. आपल्या उपदेशात आदिवासी समाजाला स्वच्छतेच्या, शिस्तीच्या व आरोग्याविषयी महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्या. हे उपदेश आदिवासी समाजाच्या उन्नतीच्या दृष्टीने महत्त्वाच्या होत्या. गुला यांचे उपदेश एक दशसूत्री मालिकेत गुंफता येईल. या दशसुत्रीमुळे आदिवासी समाजात परिवर्तन घडून आणण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

**गुला महाराजांची दशसुत्री:-**

गुला महाराजांनी आदिवासी समाजातील लोकांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी खालील महत्त्वपूर्ण उपदेश केले.-

१. शौचास जाताना पाणी घेऊन जावे.
२. दररोज अंघोळ करावी.
३. कुंकू किंवा गंध लावावे.
४. कोणत्याही मादक द्रव्याचे सेवन करू नये. (दारू, गांजा, भांग इत्यादी)
५. मांसाहार वर्ज्य करावा.
६. सत्य वचनी राहावे, खोटे बोलू नये किंवा लबाडी करू नये.
७. फसवणूक करू नये.

[5] टाटीया, कांतीलाल (२०१२ )- रावलपाणी, शिवसंघ प्रतिष्ठान, पुणे, पृ. २०.
[6] गावित, पोपट काशीराम (अप्रकाशित शोधप्रबंध-जून -२०२२)- उपरोक्त, प्रकरण सहा- ६.५.१.१

८. आपची आरती करा. एकमेकांची आरती करा.

९. सर्व मानवे ईश्वराची लेकरे आहेत.

१०. भेदभाव, भांडणे करू नये.

गुला महाराजांनी सर्व मनुष्य एकाच परमेश्वराची लेकरे आहोत हे समजविण्यासाठी ‘आप’ या शब्दाचा प्रयोग केला. यातून अनुयायींचे ‘आप मंडळ’ स्थापन झाले. गुला महाराज यांचे अनुयायी एकमेकांना अभिवादन करतांना ‘आपकी जय’ असे संबोधन करत असत.[7] गुला महाराज यांनी अक्षरांचे ज्ञान नसताना आपल्या आंतरिक विचारांचे प्रतिबिंब दर्शविण्यासाठी एका लाकडाच्या फळीवर गुढार्थ मजकूर लिहून त्या ठिकाणी रोज आरती करण्याचा प्रघात सुरु केला. यातूनच गुला महाराज यांच्या आप संप्रदायाची आरती चळवळीची सुरुवात झाली.[8]

उल्लेखनीय बाब म्हणजे, समाजप्रबोधनाची व्यापक कार्ये पार पाडताना गुला महाराजांनी स्वतःचे दैनंदिन उपजीविकेचे व्यवहार कधीही विसरले नाहीत तसेच आपल्या अनुयायांवर उदरनिर्वाहाचा भार टाकण्याचे धोरण त्यांनी स्वीकारले नाही. त्यांच्या आचरणात कोणताही दांभिकपणा आढळत नाही. साधी, स्वच्छ व शिस्तबद्ध जीवनशैलीमुळे ते आदिवासी समाजात सहज स्वीकारले गेले आणि त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल अनुयायांमध्ये दृढ श्रद्धा व विश्वास निर्माण होत गेला. मोरवड परिसरातील आदिवासी गावे गुला महाराजांना सत्पुरुष मानून त्यांच्या उपस्थितीत उपदेश ऐकण्यासाठी एकत्र येऊ लागली. त्यांच्या प्रवचनांचा प्रमुख आशय मद्यत्यागावर आधारित होता, कारण मद्यसेवनामुळे कुटुंबातील शांतता भंग होते आणि वैवाहिक नात्यात ताण निर्माण होतो, हे त्यांनी स्पष्ट केले. याच सामाजिक संदर्भातून त्यांनी ‘सतीपती आरती’ची रचना केली. गुला महाराजांच्या उपदेशांचे अनुसरण करण्यासाठी पती-पत्नी दोघांनीही सहमतीने आरतीस उपस्थित राहणे आवश्यक मानले गेले. ११ फेब्रुवारी १९३७ पासून आठवड्याच्या सोमवारी पती-पत्नींनी एकत्र आरतीस येऊन परस्परांची आरती करण्याची पद्धत रूढ झाली. ज्यामुळे वैवाहिक नात्यात परस्पर आदर, समन्वय आणि संयम यांच्या मूल्यांची वृद्धी झाली.[9] यास सकारात्मक प्रतिसाद मिळाला. कुटुंबातील परस्पर सहमतीमुळे पती-पत्नीच्या संबंधात प्रेम, आपुलकी जिव्हाळा निर्माण होण्यास मदत होऊन आदिवासींची कुटुंबसंस्था मजबूत होण्यास मदत झाली.

गुला महाराजांनी आदिवासी समाजासाठी 'आप की जय' हा नवा अभिवादन मंत्र सुरू केला. 'आप' म्हणजे 'आपण सर्व' ज्यामध्ये शोषित-पीडितांचा समावेश होतो, आणि 'जय म्हणजे 'विजय असो'. एकमेकांना भेटल्यावर हा मंत्र उच्चारण्यामागे, परस्परांच्या उद्धाराचा विचार व्हावा हा उद्देश होता. या प्रथेमुळे समाजात एकमेकांबद्दल आदर, आत्मसन्मान आणि 'आप धर्म' अशी नवी ओळख निर्माण होण्यास मदत झाली. गुला महाराजांनी समाजाच्या एकतेसाठी व ओळखीसाठी एक लाल रंगाचा ६ बाय ६ इंचाचा चौकोनी ध्वज तयार केला. भिल्ल आदिवासी समाजात बदल घडवून आणण्यासाठी व प्रस्थापित मूल्य झुगारून नवीन मूल्यांच्या आधारावर समाज परिवर्तन करण्यासाठी, क्रांतीचे प्रतीक म्हणून लाल रंग निवडण्यात आला. या ध्वजाला एक लाकडी काठी जोडलेली असे. यात, लाल ध्वज हे 'सती' (पत्नी) चे प्रतीक आणि काठी हे 'पती' चे प्रतीक मानले गेले.

[7] गावित, पुष्पा यशवंत (२०१३)- उपरोक्त, पृ. ४७.

[8] गारे, गोविंद (१९९१)- आदिवासी विकासाचे शिल्पकार, श्री विद्या प्रकाशन, पुणे, पृ. १२४.

[9] गावित, पोपट काशीराम (अप्रकाशित शोधप्रबंध-जून -२०२२)- उपरोक्त, प्रकरण सहा- ६.५.१.१

अशाप्रकारे, हा ध्वज 'सती-पती' समाजाची ओळख म्हणून प्रस्थापित झाला.[10]

आप धर्मीय अनुयायांमध्ये छोट्या ध्वजाची प्रथा रूढ झाली. पुढे चालून तीच सतीपती धर्म व गुला महाराजांच्या भक्तांची खास ओळख बनली. इतर संतांप्रमाणे गुला महाराजांनी कधीही स्वतःची आरती घ्यायची प्रथा मान्य केली नाही, ही त्यांची महत्त्वाची वैशिष्ट्यपूर्ण भिन्नता होती. आरतीत वापरल्या जाणाऱ्या फुले, कापूर, नारळ किंवा अगरबत्ती यांसारख्या खर्चिक वस्तूंना व कर्मकांडाला त्यांनी दूर ठेवले. केवळ तेल व वात यांनाच आवश्यक मानले.[11]गुला महाराज यांनी मार्मिक दृष्टीकोन ठेवून वायफळ खर्चाला विरोध केला होता.

गुला महाराजांची आरती चळवळ ही पूर्णत: निस्वार्थी व आर्थिक शोषणमुक्त स्वरूपाची सामाजिक चळवळ म्हणून ओळखली जाते. बुवा-बाजी, पाखंडीपणा, स्वार्थलालसा वा प्रचारकी थाट यांसारख्या अवांछित प्रवृत्तींपासून ही चळवळ संपूर्णपणे मुक्त असल्याचे आढळते. चळवळीत भिल्ल महिलांचा लक्षणीय सहभाग दिसून येतो, ज्यामुळे स्वच्छतेचे पालन, कुंकू–बांगड्यांचा वापर इत्यादी सकारात्मक सामाजिक आचारांचा प्रसार झाला. परिणामी, या समाजातील काही पारंपरिक अपप्रवृत्तींच्या उच्चाटनास चालना मिळाली. या चळवळीची दखल तत्कालीन खानदेशातील नेते शंकर विनायक ठकार यांनी घेतली. गुला महाराजांच्या सामाजिक परिवर्तनाची पायाभूत प्रेरणा शुद्ध हेतूवर आधारलेली असल्याने तिची तुलना १९१७ च्या रशियन साम्यवादी क्रांतीशी सैद्धांतिक स्तरावर करता येऊ शकते असे त्यांचे मत होते.[12]

गुला महाराजांचे आयुष्य अल्प असले तरी त्यांची परिवर्तनवादी कार्यदृष्टी आणि सामाजिक हस्तक्षेपाची वैचारिक भूमिका अत्यंत प्रभावी ठरली. १९ जुलै १९३८ रोजी निमोनियामुळे त्यांचे निधन झाले, आणि या निधनाने भिल्ल समाजाच्या नेतृत्वरचनेत व सामाजिक जागृतीच्या प्रक्रियेत जाणवणारी एक वैचारिक पोकळी निर्माण झाली. त्यांची अंत्ययात्रा विविध समाजघटकांच्या मोठ्या उपस्थितीत पार पडली, ही बाब त्यांच्या कार्याला मिळालेल्या सर्वसमावेशक सामाजिक मान्यतेची साक्ष देणारी ठरते.

गुला महाराजांच्या मृत्यूने आदिवासी समाजातील उगम पावत असलेली मूल्याधिष्ठित सामाजिक अनुशासनाची प्रक्रिया क्षणभर ठप्प झाली; कारण ते केवळ धार्मिक किंवा नैतिक उपदेशक नव्हते, तर आदिवासी समाजाला आत्मभान, नैतिकता आणि शिस्त यांची नवी चौकट देणारे परिवर्तनकारी चिंतक होते. त्यामुळे त्यांचे निधन हे भिल्ल समुदायासाठीच नव्हे, तर ग्रामीण समाजजीवनातील उदयोन्मुख परिवर्तनशील प्रवाहासाठीही एक निर्णायक वैचारिक धक्का मानता येतो.

### गुला महाराजांचे इतिहासातील योगदान:-

गुला महाराजांचे कार्य हे मुख्य प्रवाहातील समाजसुधारकांच्या संदर्भाऐवजी वंचित इतिहासाच्या दृष्टीकोनातून अधिक अर्थपूर्ण ठरते. परंपरागतरीत्या सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक मुख्य प्रवाहाच्या काठावर राहिलेल्या आदिवासी समाजाला त्यांची हस्तक्षेपात्मक कृतिशीलता ही खालच्या स्तरावरून उगम पावणारी परिवर्तनप्रक्रिया होती. गुला महाराजांच्या शिकवणुकीमुळे मितभाषी, उपेक्षित, निरक्षर व कमकुवत समजल्या गेलेल्या आदिवासी समाजघटकांमध्ये स्वाभिमान, आत्मभान व स्वप्रतिपादनाची क्षमता विकसित झाली.

[10] गारे गोविंद (२००५)- सातपुड्यातील भिल्ल ऐतिहासिक व सामाजिक मागोवा, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, पृ. १४३-१४४.
[11] टाटीया, कांतीलाल (२०१२ )- उपरोक्त, पृ. २०-२१.
[12] पाटील भी. ना. (२०१५)- खानदेशातील समाज प्रबोधनाची चळवळ (१९००-१९५०), प्रकाशक, भूषण पाटील, पाचोरा, पृ. ४२४-४२५.

आदिवासी समाजाने सुरू केलेल्या या अंतर्गत परिवर्तनामुळे सामाजिक संरचनेत एक उल्लेखनीय "आतून-बाहेर" क्रांती घडून आल्याचे दिसते.

सतीपती आरती चळवळीचा यशस्वी अनुभव हा वंचित गटांनी स्वतःच्या समस्यांचे निदान करून त्यावर उपाययोजना उभारण्याच्या सामुदायिक कृतीशीलतेचे उत्कृष्ट उदाहरण म्हणता येईल. दारूमुक्ती, वैवाहिक सौहार्द, नैतिक आचारसंहिता, सामाजिक शिस्त यांसारख्या मूल्यांची अंमलबजावणी कोणत्याही राज्यसत्तेच्या पाठबळाविना, औपचारिक शिक्षणाविना आणि आर्थिक मदतीविना साध्य झाली, ही बाब आदिवासी समाजाच्या स्वायत्त परिवर्तनशिलतेला अधोरेखित करते.

फैजपूर काँग्रेस अधिवेशन (१९३६) प्रसंगी महात्मा गांधींसोबतच्या भेटीनंतर गुला महाराजांनी स्वातंत्र्य, राष्ट्रप्रेम, शिक्षणविकास व सामाजिक न्यायाचा संदेश आपल्या प्रवचनातून प्रसारित केला. स्वातंत्र्य चळवळीतील आदिवासींचे योगदान इतिहासात उपेक्षित असले तरी, गुला महाराजांची भूमिका या वंचित सहभागाची पुनर्स्थापन करणारी ठरते.

दारिद्र्य, अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, न्यूनगंड, सामाजिक तिरस्कार व पीढीजात वंचना यांसारख्या संरचनात्मक अडचणींमध्ये अडकलेल्या आदिवासी समाजाला त्यांनी "आप धर्म" व सतीपती चळवळीच्या माध्यमातून सांस्कृतिक पुनरुज्जीवनाची दिशा दिली. स्त्रीसन्मान, पर्यावरण संरक्षण, प्रामाणिकता व अहिंसेसारख्या मूल्यांमुळे या समाजात नवीन नैतिक-धोरणात्मक शिस्त विकसित झाली.

परिणामी, मोडकळीस आलेली कुटुंबव्यवस्था पुन्हा उभी राहिली, आदिवासी समाज नव्या आत्मविश्वासाने उभा राहिला आणि मुख्य प्रवाहाविरुद्ध नव्हे, तर त्याच्या समांतर स्वत:चा स्वतंत्र, स्वाभिमानी समाजविकासाचा मार्ग त्यांनी घडवला. यामुळे गुला महाराजांचे कार्य वंचित इतिहासाच्या दृष्टीने उपेक्षित समुदायांनी स्वतःची मुक्ती स्वतःच्या सांस्कृतिक सामर्थ्यांतून साधलेली प्रक्रिया म्हणून महत्त्वपूर्ण अभ्यासविषय ठरते.

**निष्कर्ष:-**

सातपुड्यातील आदिवासी विशेषतः भिल्ल समाजाचा सामाजिक इतिहास दीर्घकाळ मुख्य प्रवाहातील इतिहासलेखनातून वगळला गेला. या पार्श्वभूमीवर गुला महाराजांचे कार्य हे केवळ सामाजिक सुधाराचे नव्हे, तर वंचित इतिहासाच्या पुनर्स्थापनाचे एक महत्त्वपूर्ण उदाहरण म्हणून उभे राहते. त्यांचे सामाजिक हस्तक्षेप हे "वरून-खाली" नव्हे तर "खालून-वर" स्वरूपाचे असल्याने, आदिवासी समाजाच्या स्वायत्त आणि अंतर्गत परिवर्तनक्षमतेवर नवे दृष्टीकोन उपस्थित करतात.

गुला महाराजांच्या शिकवणीचा केंद्रबिंदू दारूमुक्ती, स्वच्छता, नैतिकता, कौटुंबिक शिस्त आणि सामाजिक सौहार्द हा होता. ही मूल्ये त्यांनी कोणत्याही राज्य पाठिंब्याशिवाय, औपचारिक शिक्षणाच्या संरचनेशिवाय आणि आर्थिक साधनांशिवाय समाजात रोवली. ही बाब त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य अधोरेखित करते. त्यांच्या उपदेशांनी आदिवासी समाजात सामूहिक अनुशासन आणि सामाजिक नैतिकतेची नवी चौकट निर्माण केली, ज्यामुळे समाजाच्या आंतररचनेत प्रगतिशील परिवर्तन घडले.

सतीपती आरती चळवळ ही गुला महाराजांनी घडवलेली आत्मकेंद्रित व सांस्कृतिक पुनरुज्जीवनाची प्रक्रिया होती. या चळवळीमधून निर्माण झालेल्या समतेच्या, प्रेमाच्या आणि परस्पर आदराची मूल्ये आदिवासी

समाजाच्या सामाजिक स्थैर्याचे पायाभूत घटक बनली. विशेषतः स्त्रियांच्या सहभागामुळे या चळवळीला एक सामाजिक आधुनिकीकरणाचा स्त्रीवादी आयाम प्राप्त झाला, जो वंचित इतिहासात क्वचितच आढळतो.

महात्मा गांधींसोबतच्या संवादानंतर त्यांच्या विचारविश्वात राष्ट्रप्रेम, शिक्षण विकास, अहिंसा, आणि सामुदायिक सौहार्द यांसारख्या मूल्यांचे स्पष्ट प्रतिबिंब दिसू येते. यातून आदिवासी समाजाला स्वातंत्र्य चळवळीच्या विचारांशी सांगड घालण्याची प्रेरणा मिळाली, ज्यामुळे त्यांचे कार्य वंचित समाजाच्या राजकीय चेतनेच्या विकासातही महत्त्वपूर्ण ठरते.

त्यांच्या कार्याचा एक महत्त्वपूर्ण परिणाम म्हणजे आदिवासी समाजाच्या अंतर्निहित न्यूनगंडाचे उच्चाटन. "आप धर्म" आणि "आपकी जय" या संकल्पनांनी आदिवासींच्या सामूहिक ओळखीला स्वाभिमान दिला आणि त्यांच्या सांस्कृतिक अस्तित्वाला वैधता प्राप्त करून दिली. लाल ध्वजाच्या प्रतीकातून त्यांनी दिलेला संदेश हा सामाजिक क्रांतीचा सांस्कृतिक संकेतांक बनला.

१९३८ मध्ये गुला महाराजांच्या अकस्मात मृत्यूने आदिवासी समाजात निर्माण झालेला परिवर्तनशील वेग काही काळासाठी मंदावला; परंतु त्यांनी रुजवलेल्या मूल्यांची ऐतिहासिक प्रक्रिया दीर्घकालीन ठरली. त्यांच्या कार्यामुळे आदिवासी समाजात झालेला बदल हा व्यक्तिवादी सुधार नव्हे, तर सामुदायिक पुनर्रचना म्हणून पाहिला पाहिजे.

गुला महाराजांचे योगदान हे सामाजिक सुधारकांच्या परंपरागत प्रतिमांपेक्षा भिन्न आहे. ते केवळ उपदेशक नव्हते; ते आदिवासी समाजाच्या अंतर्गत ऊर्जा, श्रद्धा आणि सामूहिक शक्ती यांचे पुनरुज्जीवन करणारे परिवर्तनवादी चिंतक होते. त्यांच्या कार्यामुळे वंचित समाजाने स्वतःच्या सामर्थ्यावर आधारित असा विकासमार्ग निर्माण केला, जो मुख्य प्रवाहातील संस्कृतिक व राजकीय प्रक्रियांना समांतर आणि कधी कधी आव्हानात्मकही असू शकते.

गुला महाराज हे भारतीय सामाजिक इतिहासात "वंचितांच्या सामाजिक जागृतीचे जनक" म्हणून पाहिले जाऊ शकतात; आणि आदिवासी समाजातील त्यांचे कार्य हे वंचित इतिहासाच्या अभ्यासातील एक महत्त्वपूर्ण, स्वायत्त आणि मूळभूत परिवर्तनाचा दीपस्तंभ ठरू शकते.

**संदर्भग्रंथ सूची:-**

१. खोबरेकर,वि. गो. (१९९४)- महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढे (१८१८-१८८४), प्रकाशक, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
२. गारे गोविंद (२००५)- सातपुड्यातील भिल्ल ऐतिहासिक व सामाजिक मागोवा, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.
३. गारे, गोविंद (१९९१)- आदिवासी विकासाचे शिल्पकार, श्री विद्या प्रकाशन, पुणे.
४. गावित, पुष्पा यशवंत (२०१३)- संत आपश्री गुलाम महाराजांचे चरित्र, अथर्व पब्लिकेशन, जळगाव.
५. टाटीया, कांतीलाल (२०१२ )- रावलपाणी, शिवसंघ प्रतिष्ठान, पुणे.
६. पाटील भी. ना. (२०१५)- खानदेशातील समाज प्रबोधनाची चळवळ (१९००-१९५०), प्रकाशक, भूषण पाटील, पाचोरा.

७. सिमकॉक्स, ए. एच. ए. (१९१२)- मेमोर ऑफ खान्देश भिल कॉर्प्स (१८२५-१८९१), ठाकर अंड कंपनी बॉम्बे.

**अप्रकाशित शोधप्रबंध:-**

१. गावित, पोपट काशीराम (अप्रकाशित शोधप्रबंध-जून-२०२२)- भारतीय स्वातंत्र्य लढ्यात आदिवासींचा सहभाग, कवयत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.
२. यशवंत चेमा गावित (अप्रकाशित शोधप्रबंध-जून-२०२१)- ब्रिटीश राजवटीचा खानदेशातील भिल्ल अदिवाशी जमातीच्या समाज जीवनावर पडलेला प्रभाव एक ऐतिहासिक अभ्यास १८५७-१९४७, कवयत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव.